
# अण्णा हजारेंचे राळेगणसिद्धी

डॉ. पवन मांडवकर



**डॉ. पवन मांडवकर** : (१९७०) एम.ए. (इंग्रजी), एम.ए. (मराठी) (विद्यापीठातून प्रथम), बी.एड. (प्रावीण्यप्राप्त), नेट (मराठी), पीएच.डी., बालपणापासूनच साहित्यनिर्मिती, वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी भारतीय वायुसेनेत वायुसैनिक म्हणून दाखल होऊन सात वर्षे सेवा, आकाशवाणी कलाकार, 'आचार्य काव्यरत्न', 'म. ज्योतिबा फुले शिक्षाविद पुरस्कारा'सह वक्तृत्व, वादविवाद इ. स्पर्धांची अनेक पारितोषिके, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक संस्थांशी संबंधित.

**लेखकाचे सदाबहार संग्राह्य साहित्य**

✪ कादंबऱ्या - डेड लॉक, विरह, दीपशिखा, अपूर्ण संघर्ष, मी अनामिका बोलतेय ✪ कथासंग्रह - ब्यांड मास्तर, दामूअण्णा (विनोदी) ✪ बालकथा - गाढव गोष्टी, झंपू, संस्कारशील श्याम, गौरीची दिवाळी, गंमत गोष्टी ✪ काव्यसंग्रह - प्रेम कविता, ओंजळ (प्राति.), गंधाली (प्राति.), किलबिलाट (बालकाव्य) (साहित्य संस्कृती मंडळ अनुदानित) ✪ संकीर्ण - धमाल वार्ता, वास्तुशास्त्रातील ठळक संकेत, एका रखेलीची (आत्म)हत्या!, छान छान नावे बाळांची, अण्णा हजारेंचे राळेगणसिद्धी, शनिशिंगणापूर, हसणावळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सिंधू (संपादन), सद्दाम हुसेन, शरद पवार, श्री क्षेत्र चिंतामणी कळंब ✪ अभ्यासात्मक - झटपट शुद्धलेखन, झटपट पत्रलेखन, झटपट मराठी शुद्धलेखन, झटपट निबंध, ठळक शुद्धलेखन, बहिणाईची गाणी : सौंदर्य आणि समीक्षा, अर्वाचीन मराठी कविता १८८५ ते १९३५ : एक दृष्टिक्षेप, महाविद्यालयीन कार्यप्रणाली ✪



महाराष्ट्र राज्य ग्रंथ निवड समितीने
शासनमान्य यादीकरिता निवडलेले पुस्तक

# अण्णा हजारेंचे राळेगणसिद्धी

डॉ. पवन मांडवकर

स्वामी एंटरप्राईजेस
किरण बाजीराव रावण
८४२, शाहूपुरी ५ वी गल्ली
कोल्हापूर ४१६ ००१
मोबा. नं.: ९६७३७३८१८१

महाराष्ट्र राज्य ग्रंथ निवड समितीने
शासनमान्य यादीकरिता निवडलेले पुस्तक

अण्णा हजारेंचे राळेगणसिद्धी
(Anna Hajarenche Ralegansiddhi)

©डॉ. पवन मांडवकर

इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
(Dr. Pavan Mandavkar)
लेखक – संपर्क : ९४२२८६७६५८

प्रकाशन क्र. २०१
प्रकाशन दि. ३ नोव्हेंबर २०२२

प्रकाशक
स्वामी एंटरप्राईजेस
किरण बाजीराव रावण
८४२, शाहूपुरी ५ वी गल्ली
कोल्हापूर ४१६ ००१
मोबा. नं.: ९६७३७३८१८१

मुद्रक
दमयंती एजंन्सी

ISBN 978-81-870122-7-2

---

राळेगणसिद्धीचा कित्ता अन्य गावांनीही गिरवावयास हवा. त्याकरिता राळेगणसिद्धीत ‘अच्युतराव पटवर्धन प्रशिक्षण संस्थे’ची उभारणी केली आहे. अन्य गावातील समाजसेवकांना येथे प्रशिक्षण दिले जाते. भ्ष्टाचारापासून दूर, पुरस्काराच्या अपेक्षेने काम न करता ग्रामघटकांनी स्वतःला ग्रामविकासात झोकून दिले पाहिजे. कुऱ्हाडबंदी, नसबंदी, नशाबंदी, चराईबंदी आणि श्रमदान या पंचसूत्रीतून ग्रामविकास सहज शक्य आहे. ग्रामाच्या विकासात राज्याचा विकास होतो; आणि राज्यांच्या विकासावर देशाचा विकास निर्भर असतो. महाराष्ट्र शासनाने आणि त्यांच्यातील विविध घटकांनी पक्ष, राजकीय संबंध, अधिकाऱ्यांशी जवळीकता पाहून ठेके देऊन ग्रामविकासाची दिवास्वप्ने पाहण्यापेक्षा अण्णा हजारेंसारख्या एका श्रेष्ठ व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्राचा ग्रामविकास साधण्याचा प्रयत्न केला, तर महाराष्ट्राची प्रगती आकाशाला स्पर्श केल्याशिवाय राहणार नाही.

◈◈◈

राळेगणसिद्धीत माणसांचा वैयक्तिक नाही, तर संपूर्ण गावाचा वाढदिवस साजरा केला जातो. त्या दिवशी गावातील सर्वात वृद्ध पुरुष व स्त्रीची पूजा केली जाते. गेल्या वर्षभरात जन्माला आलेल्या बालकांना नवे कपडे शिवले जातात. नव्याने गावात आलेल्या सुनांची ओटी भरली जाते. हुशार, नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा, युवकांचा सत्कार केला जातो. सहभोजन आयोजित केले जाते. त्यात जाती, धर्म, श्रीमंत-गरीब असे कुठलेही भेदभाव पाळले जात नाहीत.

आज राळेगणसिद्धीचा कायापालट झाला आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या मोहिमेतून विविध बांध, नालाबंडिंग, चेकधरणे आदींद्वारे जमिनीखालील पाण्याची पातळी वाढविण्यात यश आले आहे. वर्षभर विहिरी पाण्याने भरलेल्या दिसतात. शेतीतून भरपूर पीक निघू लागले आहे. डोंगरांसह संपूर्ण परिसर हिरव्यागार वृक्षांनी आच्छादलेला आहे. धान्यबँक, सौरऊर्जा किंवा बायोगॅस, गोबरगॅस, आधुनिक जलसिंचन पद्धती, कमी खर्चात उभारण्यात येणाऱ्या भूकंपरोधक इमारती, गांडूळ खतनिर्मिती अशा अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण



# अण्णा हजारेंचे राळेगणसिद्धी

बस वळली आणि राळेगणसिद्धीच्या मार्गाला लागली. मराठवाड्याच्या अवर्षणग्रस्त प्रदेशात ह्या मार्गावर दुतर्फा हिरवेगार वृक्ष आणि सर्वत्र वनराई पाहून मन हरखून गेले. खिडकीतून येणाऱ्या आल्हाददायक वाऱ्याने अंगावर रोमांच उभे झाले. हेच राळेगणसिद्धीने केलेले आमचे पहिले स्वागत.

दि. २३ सप्टेंबर, २००३ ते २ ऑक्टोबर, २००३ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांचा उद्‌बोधन वर्ग अहमदनगर कॉलेजच्या 'एन. एस.एस. ट्रेनिंग अँड ओरिएंटेशन सेंटर'मध्ये आयोजित केल्या गेला. एक रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून मी ह्या प्रशिक्षण वर्गास गेलो होतो. 'फिल्ड व्हिजीट' म्हणून आम्हाला अण्णा हजारेंच्या राळेगणसिद्धीचा अभ्यास करण्याकरिता तिथे जाण्याचा योग आला. दृढ इच्छाशक्ती आणि प्रयत्नांची कास धरली तर गावाचा कसा कायापालट

करता येतो, हे तिथे अनुभवता आले.

राळेगणसिद्धीत प्रवेश करताना आजूबाजूच्या डोंगरांनी लक्ष वेधून घेतले. डोंगरउतारांवर ठिकठिकाणी झाडेझुडपे व गवत लावलेले होते. दगडीताली, दगडांचे बांध, माथ्यावर जलशोषक चर तर पायथ्याला पाझर तलाव, नालाबंडिंग पाहून लगेच राळेगणसिद्धीच्या विकासकामाचा पहिला टप्पा ध्यानात आला.

गावात प्रवेश केला. आमचे स्वागत केले गेले. दररोज येथे कितीतरी ठिकाणची असंख्य माणसे अण्णा हजारेंना किंवा राळेगणसिद्धीला भेट देण्यास येतात. अभ्यास करतात. येथील कार्य बघून प्रेरित होतात. आमचंही तसंच झालं. ग्रामविकासाची ही पावलं ठशांच्या रूपाने मनावर कोरली गेली.

अण्णांची बाहेरून आलेल्या व्यक्तींशी चर्चा सुरू होती. त्यांची सभा दीर्घकाळ चालणारी असावी, असे वाटले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आपल्याशी चर्चा करू इच्छितात, हा निरोप आत पोचला. थोड्याच वेळात अण्णा सभेतून बाहेर आले. अगदी नम्रपणे हात जोडून त्यांनी आम्हाला नमस्कार केला.



अंमलबजावणी होते.

'अण्णा हजारे म्हणजे भ्रष्टाचार निर्मूलनात स्वतःला झोकून देणारा माणूस' अशी त्यांचे प्रतिमा जनमानसात रुजली होती; पण त्यांचे मुख्य कार्य ग्रामविकास व पाणलोटक्षेत्रासंदर्भात आहे. ग्रामविकासात जर भ्रष्टाचार होत असेल, तर विकास खुंटतो. हेच आपल्या देशात सुरू आहे. जनसामान्यांना, गरिबांना या भ्रष्टाचाराची झळ पोचते. राज्यकर्ते आणि शासकीय कार्यालये ही भ्रष्टाचारांची केंद्रे आहे. अण्णांच्या मते पंजाब, काश्मीर, पाकिस्तानातील काहींना आपण अतिरेकी समजतो; पण भ्रष्टाचार करणारे लोकच ह्या देशाचे खरे अतिरेकी आहेत. आज देशाला प्रामाणिक, सेवाभावी, निस्वार्थी कार्यकर्त्यांची, अधिकाऱ्यांची, राज्यकर्त्यांची गरज आहे, ह्या जाणिवेतून अण्णांची भ्रष्टाचार निर्मूलनाची लढाई सुरू आहे. अण्णांच्या जनजागृतीमुळे अनेक भ्रष्टाचारी मंत्र्यांना, शासकीय अधिकाऱ्यांना आपली पदे गमवावी लागली आहेत. मात्र ही लढाई दीर्घकाळ चालणारी आहे. लगेच या लढाईचा परिणाम हाती येत नाही, असेही अण्णांनी सांगितले.

त्यांच्या दिवसाचा प्रारंभ होतो. श्रमदान, स्वच्छता, सकाळ-संध्याकाळ प्रार्थना यांत रमलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल जवळपास नव्वद टक्क्यांपर्यंत लागतो. आता तांत्रिक शिक्षणाचे पाऊलही उचलले जात आहे. या शाळेतील विद्यार्थी गावातील निरक्षरांना दत्तक घेऊन साक्षर करण्याचे कार्यही करतात. लवकरच राळेगणसिद्धी शंभर टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट गाठणार आहे. विद्यार्थ्यांकरिता मनोरंजनाच्या हेतूने चांगले चित्रपटही दाखविले जातात. विविध स्पर्धांचे आयोजनही केले जाते. एकंदरीत शिक्षणातून आदर्श नागरिक घडविण्याचे कार्य राळेगणसिद्धीत सुरू आहे.

राळेगणसिद्धीमध्ये स्थानिक कार्यसमितीद्वारे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन केले जाते. बी-बियाणे पुरवठा, अर्थपुरवठा ही कार्ये केली जातात. दुग्धविकास सोसायटी स्थापन केली असून ती दुग्धव्यवसायासंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन व मदत करते. गावातील दूध गोळा करून शासकीय डेअऱ्यांपर्यंत पोचविण्याचे काम ही सोसायटी करते. सर्व संस्थांचे कार्य, हिशोब चोख असतो. तो ग्रामसभेपुढे ठेवला जातो. त्याला मान्यता मिळाल्यावर



वयाने आणि अनुभवाने आम्ही लहान. आम्ही जी कृती प्रथम करावयास हवी होती, ती त्यांनीच केली. चेहऱ्यावर स्मित हास्य. साधा धोतरसदरा आणि गांधी टोपी असा पोशाख, डोळ्यांवर चष्मा. बघताक्षणी ग्रामीण भागातील सामान्य माणसाचं प्रतिनिधित्व करणारी ही मूर्ती. मूर्ती लहान पण कीर्ती महान. मोठमोठ्या मंत्री, अधिकाऱ्यांपासून तळागाळातील अतिसामान्य माणसांपर्यंत सर्वांशी प्रेमाने, आपुलकीने, आदराने पण तितक्याच स्पष्ट आणि परखडपणे बोलणारी, विचारांमध्ये कुठलाही किंतु-परंतु नसणारी ही महान व्यक्ती.

"या, आपण इकडेच आत बसुया." अण्णांनी सहजतेने म्हणत आम्हाला एका छोट्या हॉलकडे नेले. आम्ही घाईघाईने अण्णांच्या जास्तीतजास्त जवळ जाण्याच्या प्रयत्नात निघालो. शांतपणे अण्णा आत शिरले. आम्हाला बसायची विनंती करून ते सतरंजीवर मांडी घालून बसले. कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या वतीने मी अण्णांना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. त्यावेळी अण्णा भ्रष्टाचारविरोधी चळवळीत फारच सक्रिय होते. दूरदर्शनवरही नुकतीच महाचर्चा झालेली होती. त्यात सुरेशदादा जैन व अण्णा

हजारे यांनी एकमेकांवर भ्रष्टाचार, हिशोबांतील अनियमितता यांचे आरोप केले होते. अण्णांनी आमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे विनम्रतेने, शांतपणे आणि आम्हाला पटतील अशीच दिली. अण्णांजवळ स्वतःची संपत्ती नाही. संपत्तीच्या लालसेसाठी कुटुंब नाही. राळेगणसिद्धीतील सर्व नागरिक किंवा या देशातील सर्व जनसामान्य अण्णांचे कुटुंबीय आहेत. सर्व अण्णांचे आहेत, अण्णा सर्वांचे आहेत.

सुमारे दीड तास अण्णांशी चर्चा केली. चेहऱ्यावर तोच उत्साह, ग्रामविकासाची तीच तळमळ. ग्रामविकासात आडकाठी आणणाऱ्या स्वार्थी राजकारणी आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या विरोधात उभी ठाकलेली चळवळ. ही नंतरची किंवा दुय्यम. पण अण्णांची खरी चळवळ ही ग्रामविकासाची. प्रेरणादायक. प्रवर्तक.

आमची बस परत निघाली. सगळेजण विचारांत मग्न झालेले. गांधीजींना बघण्याची संधी मिळाली नाही; पण याच देशाचे दुसरे गांधीजी 'अण्णा' आम्हाला जवळून बघता आले. अनुभवता आले. 'तुम्ही बोलवा, मी तुमच्या भागातही येईन.' हे अण्णांचे शब्द मनात गुंजत राहिले. अण्णांच्या राळेगणसिद्धीवर निश्चितच



सफाईसुद्धा श्रमदानातून केली जाते, याचे आश्चर्य पांढरपेशा मंडळींना वाटल्यास नवल नाही.

शिक्षणाचे महत्त्व अण्णांनी ओळखले; पण नुसते पुस्तकी शिक्षण उपयोगाचे नाही. शिकला सवरला लेक शेतीत काम करायला लाजतो. आजच्या शिक्षणाने गरीब-श्रीमंत दरी अधिकच मोठी झाली आहे. सामाजिक बांधिलकीच्या ठिकऱ्या उडाल्या आहेत. मात्र अण्णांनी राळेगणसिद्धीत मानवतावादी शिक्षणाचा प्रारंभ केला. जीवन शिक्षण देणाऱ्या राळेगणसिद्धीत संत यादवबाबा शिक्षण प्रसारक मंडळामार्फत दहावीपर्यंत शिक्षण मिळते. सुसंस्कारी, राष्ट्रभक्तीपर, परोपकार करण्यास शिकविणारे हे शिक्षण आहे. बंधुभाव, निसर्गप्रेम, श्रमदान, जातिभेदनिर्मूलन ही येथील शिक्षणाची काही वैशिष्ट्ये. या कार्यात स्वतःला झोकून देणारी शिक्षक मंडळी येथे आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ते साधतात. खेळ, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम यांनाही अभ्यासाइतकेच प्राधान्य दिले जाते. तिथे नापासांची शाळा आहे. उनाड, नापास मुलांकरिता यादवबाबा वसतिगृह स्थापन केले आहे. पहाटे साडेपाच पासून क्रीडांगणावरील व्यायामापासून

मानाचे स्थान दिले गेले आहे. श्रमदान असो किंवा ग्रामपंचायतीच्या निवडणुका राळेगणसिद्धीवासीयांनी महिलांनाच प्राधान्य दिले आहे. ग्रामसभेवर त्या अविरोध निवडल्या जातात. ग्रामपंचायतीचा कारभार चालवितात. शिवणकाम, भरतकाम, विणकाम असे वर्गही चालविणाऱ्या या स्त्रिया राळेगणसिद्धीचा विकास साधत आहेत.

अण्णांनी सांगितले की नऊ पंचवार्षिक योजना राबविल्यानंतरही आणि प्रचंड पैसा खर्च करूनही सरकारला ग्रामविकास साधता आला नाही. वनखात्याने लावलेल्या झाडांचे महत्त्व माणसांना नसते; पण तेच झाड एखाद्याने स्वतः लावले असेल, तर तो त्याची अधिक काळजी घेतो. म्हणून राळेगणसिद्धीत श्रमदान आणि स्वावलंबनातून ग्रामविकास साधला जातो. येथे कुटुंबातील सदस्यांनुसार प्रत्येकाला श्रमदानाचे वाटप केले जाते. सवडीनुसार पंधरा दिवसांत एक दिवस प्रत्येक जण श्रमदान करतो. अत्यंत गरीब आणि वृद्धांना श्रमदानातून सूट दिली जाते. श्रमदानातून वृक्षारोपण, पाझर तलाव, शेततळी, सामुदायिक विहिरी, नालाबंडिंग, शाळा, वसतिगृह अशी कितीतरी निर्मिती झाली आहे. ग्रामसफाईबरोबरच सार्वजनिक संडास



लिहिले पहिजे, ही दृढ इच्छा तेव्हाच निर्माण झाली.

आज जेव्हा सर्वत्र कर्जबाजारीपणा, नापिकी, अपुरा पाऊस अशा अनेक कारणांनी शेतकरी आत्महत्या करीत आहेत, विदर्भात तर शेतकऱ्यांच्या आत्महत्येने ३५० च्या जवळपास आकडा गाठला आहे. निसर्गाचा दगा, ओलिताची कमतरता, अपुरे सिंचन प्रकल्प, वीज भारनियमन, जागतिकीकरण, वाढती महागाई, व्यापाऱ्यांची हेकेखोरी, सावकारी पाश, उदासीन शासन, भ्रष्टाचारी यंत्रणा या सर्व कारणांमुळे ग्रामीण भागात नैराश्याचे वातावरण पसरलेले आहे, अशा वेळी शासकीय मदतीच्या अपेक्षांवर अवलंबून न राहता अण्णा हजारेंचा 'राळेगणसिद्धी पॅटर्न' गावोगावी राबविण्याची गरज निर्माण झाली आहे. त्या 'राळेगणसिद्धी पॅटर्न'चाच हा लेखाजोखा.

श्री. अण्णा हजारे इ.स. १९७५ मध्ये सैन्यातून निवृत्त झाले. राळेगणसिद्धीत परतल्यावर त्यांच्या लक्षात आले की, राळेगणसिद्धीची परिस्थिती फारशी चांगली नाही. यादवबाबा मंदिराची पडझड झाली होती. गावात दारुभट्ट्या चालत होत्या. शेतकरी कर्जबाजारी झाले होते. शासनाचे ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होते.

ग्रामीण भागाकडील माणसे शहराकडे धाव घेत होती. शेतीला आणि पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळत नव्हते. राळेगणसिद्धीतील पालकांचे आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे मुळीच लक्ष नव्हते. अण्णा हजारेंनी ही परिस्थिती बघितली. त्यांनी सर्वप्रथम यादवबाबा मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचे ठरविले. त्या मंदिराची खिडक्यादारे लोकांनी हातभट्टीत जाळली होती. अण्णांनी गावातील तरुणांना एकत्रित केले. स्वतःच्या भविष्यनिर्वाह निधीतील वीस हजार रुपये खर्च करून त्यांनी तरुणांच्या मदतीने यादवबाबा मंदिराचा जिर्णोद्धार केला. केवळ पूजेचे मंदिर या भावनेने मंदिराकडे न बघता एक समाजसेवा मंदिर ते कसे होईल, याचा त्यांनी विचार केला. याच मंदिरात ग्रामस्थांना एकत्र आणून ग्रामविकास आणि व्यसनमुक्तीचे धडे त्यांनी दिले. त्या काळात ग्रामसभेत व्यसनमुक्तीचा ठराव झाला. तरुणांच्या मदतीने गावातील दारूच्या हातभट्ट्या बंद करण्यासाठी त्यांनी भट्ट्या मालकांना विनंती केली. दारूमुळे गरिबांची कुटुंबे कशी उद्ध्वस्त होतात, हे त्यांनी पटवून दिले; पण शेती पिकत नाही, सावकाराने जमीन हडपली किंवा पाण्याचे दुर्भिक्ष्य अशा अनेक कारणांनी शेतीपासून



कमतरता भासू लागली आहे. जंगले, इंधन, धान्य कमी पडू लागले आहे. लोकसंख्या नियंत्रणाविषयी कडक कायदे केल्या गेले असते, तर ही परिस्थिती उद्‌भवली नसती. राळेगणसिद्धीत कुटुंबनियोजनाचे महत्त्व पटवून दिल्या गेले. तरीही काही गावकरी कुटुंबनियोजनास तयार होत नव्हते, तेव्हा कुटुंबनियोजन न करणाऱ्यांना शासकीय योजनांचा, ग्रामविकासाचा फायदा दिला जाणार नाही, असा ठराव ग्रामसभेत करण्यात आला. सुरुवातीला केवळ मुलीच असणाऱ्यांनी मुलाची अपेक्षा ठेवली आणि या नियमातून सूट मागितली; पण आज राळेगणसिद्धीत मुलामुलींत भेदभाव केला जात नाही. वृद्धापकाळात मुलांपेक्षा मुली आपल्या मातापित्यावर अधिक प्रेम करतात. त्या मुलांपेक्षाही अधिक प्रमाणात कर्तृत्ववान असतात, हे राळेगणसिद्धीवासीयांना पटले आहे. स्त्रीपुरुषसमानतेचे आपण गोडवे गातो; पण भारतात खरोखर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने वागविले जाते का? त्यांना समान अधिकार दिले जातात का? मुलगा झाला की आनंद आणि मुलगी झाली की दुःख मानणारी विचारप्रणाली आजही या देशात आढळते. राळेगणसिद्धीतमात्र महिलांना

हा गॅस वापरला जात आहे. येथे महिलांच्या आरोग्याचा विचार केलेला आहे. चुलींच्या धुराने, प्रदूषणाने जो त्रास महिलांना व्हायचा, तो बंद झाला आहे. निर्धूर चुली, गोबर गॅस व बायोगॅस प्रकल्प हे राळेगणसिद्धीचे विशेष आहे. प्रदूषणासारख्या समस्यांची जाण करून देऊन येथे मुलांनाही स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले जाते.

गर्भवती महिलांच्या आरोग्याविषयी राळेगणसिद्धीत यथायोग्य काळजी घेतली जाते. गावातच एका प्रसूतिगृहाची निर्मिती केलेली आहे. काही महिलांना आरोग्यशास्त्रातील प्रसूतिशास्त्राचे प्रशिक्षणही दिले गेले. पोलिओ डोसपासून सर्व आरोग्यविषयक कार्य ह्या महिला करतात. आजारी पडून नंतर औषधोपचार करीत बरे होण्यापेक्षा आजारीच पडू नये म्हणून राळेगणसिद्धीत काळजी घेतली जाते. म्हणूनच आज या गावात कोणी खाजगी डॉक्टर आपला दवाखाना उघडण्याची हिंमत करू शकला नाही.

सुमारे एकशे पाच कोटी लोकसंख्या असलेल्या या भारत देशात कुटुंबनियोजनाची अत्यंत आवश्यकता आहे. लोकसंख्या अधिक आणि जीवनावश्यक गोष्टींची



फारकत घेऊन दारूभट्ट्या स्थापन केलेल्या या भट्ट्यामालकांनी मग जगायचे तरी कसे, असा प्रश्न केला.

दारूभट्ट्या मालकांच्या पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना ग्रामविकासात किंवा शेतीच्या कामात पुन्हा गुंतवले पाहिजे, ही गोष्ट अण्णांच्या लक्षात आली. सुरुवातीला त्यांनी पाणलोट विकासाचे कार्य हाती घेतले. पडलेला पाऊस वाहून जाऊ नये, म्हणून पाणी अडवण्यास सुरुवात केली. पाणी अडवलं, ते जमिनीत झिरपलं आणि जमिनीतील पाण्याची पातळी वाढली. पाण्याची उपलब्धता झाली आणि शेती चांगली पिकू लागली. परिणामी अण्णांच्या या कार्यावर लोकांचा विश्वास वाढला. बहुतेकांनी दारूभट्ट्या बंद केल्या. काहींना शेतातले कष्ट रुचले नाहीत. ते चोरून दारूभट्ट्या चालवीत असत. अशा या भट्ट्या अण्णांनी तरुणांच्या मदतीने तोडल्या. हळूहळू सगळे गावकरी अण्णांच्या बाजूने उभे राहिले. मोजक्या दारूभट्टीवाल्यांचे धंदे कायमचे बंद झाले. अण्णांच्या प्रयत्नांनी आणि समाजप्रबोधनातून बहुतेक दारू पिणाऱ्यांनी दारू सोडली.

अण्णांनी व्यसनमुक्तीच्या प्रयत्नात केवळ दारूबंदीलाच प्राधान्य दिले नाही, तर धूम्रपान व इतर व्यसनांनाही तिलांजली देण्याचा प्रयत्न सुरू केला. अण्णांनी सांगितले, की होळी हा दुष्ट प्रवृत्ती नाहीशी करणारा सण आहे. अग्नीची पूजा ही माणसांनी विकृत बनवली आहे. धरतीवरची हिरवी झाडे जाळून निसर्गाला नष्ट करणारी ही होळी होती; पण आम्ही दुर्गुणांची होळी करण्याचे ठरविले. होळीच्या दिवशी गावातील विविध दुकानांमधील बिड्या, सिगारेटी, तंबाखू असे सर्व साहित्य खरेदी करून त्यांची होळी केली. गेल्या अनेक वर्षांपासून गावात कोणताही दुकानदार तंबाखू, सिगारेटी किंवा विड्या विक्रीसाठी ठेवत नाही.

व्यसनमुक्ती चळवळीनंतर अण्णांनी पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रम हाती घेतला. पावसाचे पाणी अडविण्याचे महत्त्व ग्रामस्थांना त्यांनी पटवून दिले. राळेगणसिद्धीच्या परिसरातील छोट्या-मोठ्या डोंगरांच्या माथ्यापासून पायथ्यापर्यंत सर्वत्र पाणी अडविण्याचा प्रयत्न सुरू झाला. डोंगरांच्या माथ्यावर जलशोषक चर तयार करण्यात आले. उतारावर गवत किंवा झाडेझुडपे लावून



म्हणजे आरोग्य आणि स्वच्छतेचा. सर्वाधिक रोग हे दूषित पाण्यामुळे होतात, ही वस्तुस्थिती आहे. जिथे अशुद्ध पाणी आहे, तिथे रोगराई अधिक आहे. जिथे शौचालये नाहीत, लोक उघड्यावर प्रातःर्विधी करतात, सांडपाण्या वाहून नेणाऱ्या नाल्या नाहीत किंवा गटारे निर्माण झाली आहेत, अशा ठिकाणी डासांचा प्रादुर्भाव वाढतो, विषाणूंची संख्या वाढते. जेथे कचराकुंड्या नाहीत, गावाबाहेर कचरा नेण्याची यंत्रणा नाही, त्या गावात घाणीमुळे रोगराई निर्माण होते. कावीळ, डायरिया (उलट्या, हगवण), कॉलरा, नारू, व्हायरल फिव्हर, मलेरिया असे कितीतरी रोग होऊ शकतात. मात्र राळेगणसिद्धीमध्ये जवळपास बारा कूपनलिका निर्माण करण्यात आलेल्या आहेत. जमिनीखालील शुद्ध पाणी लोकांना मिळू लागले आहे. विहिरींमध्ये अंघोळींना बंदी घातली गेली. सांडपाणी वाहून न्यायला नाल्या आहेत. जेथे नाल्यांची सोय करता आली नाही, तेथे घराशेजारी शोषखड्ड्यांची निर्मिती करण्यात आली आहे. घरोघरी शौचालये निर्माण करण्यावर जोर दिलेला आहे. सार्वजनिक शौचालयांची निर्मितीही केल्या गेली आहे. त्यावर बायोगॅस प्लँट उभारून स्वयंपाकासाठी

बोकड आपल्याला खायला मिळणार नाही, हे जाणून लोकांनी बोकड किंवा बकरी परत घरी नेली. या प्रकाराने देवीचा भगत संतापून उठला. आता आपल्याला फुकटच्या बकरीवर ताव मारता येणार नाही, हे जाणून त्याने आपल्या अंगात पद्मावती संचारली, असा आव आणला. देवीचा कोप होणार म्हणून तो सांगू लागला. गावातील लोक घाबरले. तरुण कार्यकर्त्यांनी भगताला समजावून पाहिले; पण जेव्हा तो ऐकेना, तेव्हा त्याला तरुणांनी झोडपून काढले. त्याक्षणी त्याच्या अंगातील देवी पळून गेली. अजूनही राळेगणसिद्धीवर देवी कोपलेली नाही. अन्य कितीतरी गावांच्या तुलनेत राळेगणसिद्धी प्रगत आहे, प्रगतीपथावर आहे. तरुणांनी रस्त्यात वाहतुकीला अडथळा निर्माण करणारे गावातील देव स्वतः हलविले. क्षुद्र देवीदेवतांचा सुळसुळाट कमी झाला. लोक जागृत झाले. बळीप्रथा बंद झाली. आज राळेगणसिद्धीतील सर्व माणसे शाकाहारी झालेली आहेत. उपरोक्त प्रसंगावरून संत गाडगेबाबांच्या समाजकार्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

अण्णा हजारेंच्या ग्रामविकासातील एक टप्पा



कुरणविकास साधला. मोठ्या दगडांचे बांध किंवा दगडी ताली, बंधारे तयार करण्यात आले. डोंगरांच्या पायथ्याशी बांध बंदिस्ती, नालाबंडिंग किंवा पाझर तलावाची निर्मिती करण्यात आली. पाणलोटाचे पाणी वाहून नेण्यासाठी ज्या नाल्या तयार करण्यात आल्या, त्या नाल्यांच्या वाढत्या रुंदीमुळे गॅबियन बंधारे, भूमिगत बंधारे अथवा सिमेंटचे बंधारेही बांधले गेले. नाल्याला सरळ करण्याचा प्रयत्न केला गेला. राळेगणसिद्धीमध्येच पाणी अडवले जाऊन जिरवले जाऊ लागले. साहजिकच भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली. विहिरी पाण्याने भरू लागल्या. बागायती शेती वाढू लागली. अण्णांनी दिलेल्या माहितीनुसार राळेगणसिद्धीत पूर्वी सत्तर ते ऐंशी एकर बागायत होती. ती पाणलोट क्षेत्रविकासामुळे बाराशे एकरांवर पोचली आहे. शेती पिकू लागली आणि पोटाचा प्रश्न सुटला. शेतीत राबणाऱ्यांची संख्या वाढली. त्यांच्या हाताला काम मिळालं. गरिबी दूर होऊ लागली. राळेगणसिद्धीत पाण्याची उपलब्धता वाढली तरी अवास्तव पाणी वापरावर अंकुश ठेवल्या गेला. आवश्यकतेपेक्षा पिकाला अधिक पाणी दिले गेले तर पीक अधिक येते, ही काही शेतकऱ्यांची

चुकीची भावना होती. पाण्याचा वापर नियोजनबद्ध, काटकसरीने, आवश्यक तेवढाच व्हावा, म्हणून पाण्याचे शास्त्रशुद्ध पद्धतीने नियोजन केले गेले. पुष्कळदा आवश्यकतेपेक्षा अधिक पाणी दिले गेले, तर जमिनीवर क्षार येतात. पिकाला पाणी मिळण्याऐवजी जमिनीलाच जास्त पाणी मिळते आणि क्षारांमुळे जमिनी नापीक होतात, हे ग्रामस्थांना पटवून दिल्या गेले.

राळेगणसिद्धीत सामुदायिक विहिरींच्या सोसायट्या निर्माण केल्या गेल्या. प्रत्येक कास्तकाराला पाणी पुरवठ्याचे रेशनकार्ड दिल्या गेले. त्या कास्तकाराचा नंबर आल्यावर त्याला पाणी मिळायचे आणि त्याकरिता त्याच्याकडून दरवर्षी नाममात्र पाणीपट्टी आकारली गेली. आज जवळजवळ हजार एकर जमिनीला पाणी पुरेल अशा जलसिंचन योजना तिथे आहेत.

राळेगणसिद्धीत सुमारे वीस टक्के शेतकऱ्यांच्या जमिनी उंचीवर आहेत. त्यांना पाणलोट क्षेत्रातले पाणी मिळणे कठीण जाते. परिणामी केवळ पावसाच्या पाण्यावर त्यांची शेती अवलंबून असते. ते कास्तकार सधन होऊ शकले नाहीत. काही वेळा त्यांना धान्याची कमतरता



विचार न करता गरीब पालकांना सवलत दिली जाते. लग्नाचे विधी मात्र कौटुंबिक परंपरेनुसार करता येतात.

भारताला लागलेला एक कलंक म्हणजे अंधश्रद्धा. ढोंगी साधू, शेंदूर फासलेले दगडधोंडे, देवाच्या नावावर प्राण्यांचा बळी मागणारे बुवा, महाराज ही सगळी अंधश्रद्धेची मुळे आहेत. ग्रामीण भागात मरिआई, म्हसोबा, वेताळ, सटवाई अशा अनेक देवदेवतांचे पूजन आढळते. संत तुकारामांनी सतराव्या शतकात त्यांना ‘क्षुद्र देवीदेवता’ संबोधून अशा पूजनावर आणि भोंदू साधूंवर व्यापक प्रमाणात आपल्या अभंगांतून टीका केलेली होती. तरीही आज काही ग्रामांत असे प्रकार आढळतातच. राळेगणसिद्धीत सर्व माणसे या अंधश्रद्धांपासून दूर गेलेली आहेत. गावातील पुरातन पद्मावती मंदिरात पूर्वी बोकड कापले जायचे. ही प्रथा अतिशय विचारपूर्वक गावातील तरुणांनी कौशल्याने बंद केली. देवीच्या यात्रेच्या वेळेस त्यांनी होम पेटविला; आणि ज्याला बकरी किंवा बोकड कापावयाचा असेल, त्याने तो कापून घरी न नेता किंवा न खाता त्या होमात अर्पण करून टाकायचा असा निर्णय सांगितला. देवीच्या नावावर बळी दिला जाणारा आपला

याशिवाय हाडवळा डोंगरातील पन्नास एकर जमीन ग्रामस्थांनी श्रमदानाने पिकवून दलितांच्या डोक्यावरचे ओझे संपुष्टात आणले आहे. गावकुसाबाहेरची माणसं वेशीच्या आत आणून, त्यांना जागा देऊन त्यांची घरे निर्माण करण्याकरिता सर्व माणसे एकत्र राबली आहेत.

विवाह हा आनंदाचा सोहळा असतो. श्रीमंत माणसं आपल्या मुलामुलींच्या विवाहात प्रचंड प्रमाणात खर्च करतात; पण गरीब माणसं आपल्या मुलामुलींची लग्न थाटात कशी करू शकणार? त्यातही मानपान आणि हुंड्यासारख्या समस्या जिकडेतिकडे आढळतात. इ.स. १९७८ च्या सुमारास राळेगणसिद्धीने सामुदायिक विवाहाची परंपरा निर्माण केली. खर्चावर नियंत्रण ठेवून एका लग्नसराईत तीस-चाळीस विवाह व्हायला लागले. राळेगणसिद्धीत मुलामुलींचे पालक विवाह ठरवतात. त्याची माहिती युवक मंडळाकडे दिली जाते. युवक मंडळ आणि पालकांची बैठक होऊन त्यात तिथी ठरते. प्रत्येक तिथीला दहा-पंधरा विवाह एकत्र होतात. हा समारंभ व्यवस्थित पार पाडण्याचे काम युवक मंडळ करते. लग्नाला येणारा खर्च पालकांमध्ये विभागला जातो. जातीचा किंवा लग्नाचा



भासते. त्याकरिता अण्णांच्या प्रेरणेने राळेगणसिद्धीमध्ये धान्यबँक सुरू करण्यात आली. जास्त धान्य निर्माण करणारे कास्तकार धान्यबँकेमध्ये आपल्या उत्पन्नानुसार ठरावीक पायल्या धान्य देणगी स्वरूपात जमा करतात. दरवर्षी काही क्विंटल धान्य या बँकेत जमा होते. धान्यासाठी ज्या गरजू लोकांचा अर्ज येतो, त्यांच्या गरजेनुसार ग्रामसभेने ठरविल्याप्रमाणे धान्यवाटप होते. परंतु जेव्हा त्यांच्या शेतात धान्य पिकते, तेव्हा घेतलेल्या धान्याच्या वीस टक्के धान्य अधिक वसूल करण्यात येते. या धान्यबँकेत जे जास्त धान्य जमा झालेले असते, ते यादवबाबा वसतिगृहातील गरीब मुलांच्या भोजनासाठी अथवा अन्य विकासासाठी वापरण्यात येते. हे धान्य गरजू शेतकऱ्यांना विनामूल्य का दिले जात नाही, याचे उत्तर असे मिळाले की कुठलीही गोष्ट फुकट मिळायला लागली, की तिची किंमत राहत नाही. श्रम करण्याची त्यांची तयारी राहत नाही आणि भिकमाग्या प्रवृत्तीने ते आळशी बनतात.

अहमदनगर आणि आसपासच्या परिसराला 'रेन शॅडो एरिया' असे म्हटले जाते. या भागात पाऊस फारच कमी पडतो. पावसाचे प्रमाण वाढवायचे असेल,

तर डोंगरांच्या रांगांच्या अडचणी जरी बाजूला ठेवल्या, तरी वृक्ष लावणे अधिक महत्त्वाचे ठरते; कारण झाडांमुळे ढगनिर्मितीस सहाय्य होते. झाडांमुळे गारवा वाढतो. गारवा वाढला, की ढग आकर्षित होतात. पाऊस पडतो. म्हणून जिथे झाडे अधिक असतात, तिथे पाऊसही अधिक पडतो. झाडांचा आणखी एक फायदा म्हणजे ते जमिनीवरील सुपीक माती धरून ठेवतात. पाण्याच्या प्रवाहांना अडथळा निर्माण करतात. परिणामी पावसाचे पाणी जमिनीत मुरते. झाडांमुळे वातावरण स्वच्छ राहते. प्रदूषण कमी होते. कार्बन डाय ऑक्साईड घेऊन ही झाडे ऑक्सिजन देतात. इतरत्र वृक्षतोडीचे प्रमाण वाढते आहे. इतरत्र पावसाचे प्रमाणही कमी होते आहे; पण राळेगणसिद्धीत जवळपास चार लाख झाडे लावली गेली आणि वाढवली गेली. कुऱ्हाडबंदी आणि चराईबंदी लागू करून राळेगणसिद्धी हिरवेगार केले गेले. यांमुळे गुराढोरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होऊ शकत होता; म्हणून सुमारे पाचशे एकर गायरान जमिनीत वेगळी झाडे आणि गवत लावून गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि इंधनाचा प्रश्नही निकाली काढला आहे.



राळेगणसिद्धीतील पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर झाले. पाऊस बऱ्यापैकी पडू लागला. पडला तो जिरवण्यात येऊ लागला. बागायती जमीन वाढली. धान्यबँकेमुळे गरीब कास्तकारांचाही प्रश्न सुटला. व्यसनमुक्ती झालेलीच होती; पण अशा आणखी काही समस्या होत्या, ज्या ग्रामीण भागात सर्वत्रच असतात. त्या समस्यांकडे अण्णा हजारे आणि राळेगणसिद्धीवासी वळले. त्यामध्ये जातिभेदनिर्मूलन, अंधश्रद्धा व अनिष्ट रूढींना तिलांजली, आरोग्य आणि स्वच्छतेचे महत्त्व, कुटुंब नियोजन, सामुदायिक विवाह इत्यादींचा समावेश होता. पूर्वी भारतात अस्पृश्यता पाळली जायची. दलितांना गावकुसाबाहेर राहावे लागे. त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले गेले होते. राळेगणसिद्धीत या जातिप्रथेला तिलांजली दिली गेली. ‘एक गाव, एक पाणवठा’ ही योजना राबवताना सर्व जातीची माणसे मिळूनमिसळून वागू लागली. विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ लागली. फार पूर्वी पोळ्याच्या मिरवणुकीत वेशीत जाण्याच्या पहिल्या मानाकरिता मारामाऱ्या, भांडणे होत असत. आज राळेगणसिद्धीत वेशीत जाण्याचा पहिला मान दलितांना दिला जातो.